# विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
# शासकीय विमा निधी

**महाराष्ट्र शासकीय विमा निधीची स्थापना :**

शासकीय विमा निधी हा केंद्रीकृत कार्यक्रम म्हणून लोकलेखा समितीने केलेल्या शिफारसीवरून सन १९५१ मध्ये सुरु करण्यात आला आहे. मूलतः हा निधी विविध शासकीय विभागाच्या विशेषतः वाणिज्यिक आणि/ किंवा औद्योगिक उपक्रमांच्या (ज्यांना सामान्यपणे नेहमीच्या वाणिज्यिक/ व्यापार प्रथेनुसार विमा उतरवावा लागतो) विमाविषयक गरजा पुरविण्यासाठी सुरु करण्यात आला. त्याचे प्रत्यक्षरित्या व्यवस्थापन वित्त विभागाच्या अधिपत्याखाली होते.

शासकीय विमानिधीव्दारे चालविल्या जाणाऱ्या विमा व्यवसायाची व्याप्ती वाढल्यामुळे तसेच शासकीय विमानिधीचे कामकाज वाणिज्यिक व तांत्रिक स्वरूपाचे असून इतर शासकीय विभागापेक्षा भिन्न स्वरूपाचे असल्यामुळे विमानिधीचा कारभार सुरळीत चालावा म्हणून प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने शासनाने दिनांक १ सप्टेंबर १९७२ पासून स्वतंत्र विमा संचालनालय आस्थापना वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली स्थापना केली. विमा संचालक हे या विभागाचे विभागप्रमुख असून, विमा अधिनियम-१९३८ अनुसार ते शासकीय विमानिधीचे प्रमुख अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत.

**शासकीय विमानिधीच्या स्थापनेमागील उद्देश :**

**शासकीय विमानिधीच्या स्थापनेमागील प्रमुख उद्देश खालील आहेत.:**

(अ) विमा कंपन्या आकारित असलेल्या विम्याच्या हप्त्यातील नफ्याचा अंश शासनाच्या फायद्यासाठी वाचविणे.

(ब) जेणेकरुन शासनाला, इतर विमा कंपन्यांबरोबरची आपल्या विम्याची मर्यादा कमी करणे शक्य होईल अशा प्रकारे एक निधी तयार करणे.

(क) शासन आणि अन्य राज्य सांविधिक महामंडळे यांच्यासाठी विम्याचा खर्च शक्य असेल त्या प्रमाणात कमी करणे,

(ड) शासकीय वाणिज्य उपक्रमांच्या बाबतीत वस्तुच्या ग्राहकांवर आणि या उपक्रमांनी दिलेल्या सेवेचा उपयोग करुन घेणाऱ्यांवर विम्याचा खर्च योग्य त्या प्रमाणात हस्तांतरित करता येणे.

(इ) शासकीय हितसंबंध असलेल्या संस्थांना इतर विमा कंपन्यांकडे सहविमा पद्धतीखाली विमा उतरविताना येणाऱ्या अडचणी दूर करून मार्गदर्शन करणे.

(ई) राज्याच्या विकासासाठी विमानिधी हे घोषवाक्य स्विकारुन विमाहप्त्याच्या स्वरुपात विकास कामासाठी विनाकर महसूल मिळवून देणे.

विमाहप्त्याच्या स्वरूपात शासनाच्या विकास कामाकरीता विनाकर महसूल प्राप्त करणे हा शासकीय विमानिधीचा मुख्य उद्देश विचारात घेऊन शासनाने वेळोवेळी शासन निर्णय, परिपत्रके निर्गमित करुन सरकारी खात्यांनी विविध मालमत्तेचा विमा उतरविण्याबाबत पाळावयाची मार्गदर्शक तत्वे विहित केली आहेत. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या विमाविषयक शासन निर्णयानुसार विमा व्यवहाराची व्याप्ती वाढली व त्यामुळे शासकीय विमा निधीच्या स्थापनेमागील उद्दीष्टातही वाढ होत गेली. राज्य शासनाने **"राज्याच्या विकासासाठी विमा निधी"** हे घोषवाक्य स्विकारल्यानंतर विमाहप्त्याच्या स्वरुपात राज्याच्या विकास कामासाठी विनाकर महसूल मिळवून देणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे.

**विमा अधिनियमांतर्गत कायदेशीर मान्यता :**

विमा अधिनियम (सुधारित) १९६८ संमत झाल्यावर शासकीय विमानिधी सर्वसाधारण विमा व्यवसाय चालू प्राधिकृत विमाकार म्हणून नोंदविला गेला आहे. सर्व साधारण विमा व्यवसाय (राष्ट्रीयकरण) अधिनियम १९७२ च्या कलम ३६ नुसार प्रत्येक राज्य शासकीय विमानिधीचे आप आपले सर्वसाधारण विमा व्यवसाय चालू ठेवण्याचे हक्क परिरक्षित करण्यात आले. या कलमानुसार जी शासकीय खाती, निमशासकीय खाती, राज्य संविधिक संस्था व इतर औद्योगिक व व्यापारी संस्थामध्ये शासनाचे भागभांडवल, कर्जे, हमी इत्यादी भरीव वित्तीय हितसंबंध गुंतले आहेत, त्यांच्या मालमत्तेच्याबाबतीत सर्वसाधारण विमा व्यवसाय करण्याऱ्या राज्य शासकीय विमानिधीना या अधिनियमात सूट देण्यात आली आहे.

**शासकीय विमानिधीचे आस्थापना नियंत्रण :**

सुरवातीपासून शासकीय विमानिधी हा मंत्रालयातील वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कार्यरत आहे. सन १९७२ पर्यंत शासकीय विमानिधीच्या प्रमुख पदावर विमा अहर्ताप्राप्त अधिकाऱ्यांची विमाअधिकारी म्हणून नियुक्ती वित्त विभागात केली जात होती. वित्त विभागाच्या विमा शाखेतील कामाचे स्वरुप मंत्रालयातील कामापेक्षा भिन्न स्वरुपाचे असल्यामुळे व विमा विषयक अर्हता असलेला अधिकारी/ कर्मचारी वर्ग नियुक्ती करणे सोयीचे जावे तसेच विमा उतरवितांना अधिकारी व कर्मचारी यांना वाणिज्यीक धर्तीवर काम करावे लागत असल्याने प्रशासकीय दृष्टीने शासनाने दिनांक १ सप्टेंबर, १९७२ पासून विमा संचालनालय या नावाचा एक स्वतंत्र विभाग शासकीय विमा निधीच्या प्रशासनासाठी निर्माण केला. शासकीय विमानिधी शासनाच्या वित्त विभागाच्या प्रशासनिक नियंत्रणाखाली कार्यरत आहे. विमा संचालक हे शासकीय विमानिधीचे विभागप्रमुख असून, विमा अधिनियम १९३८ नुसार ते शासकीय विमानिधीचे प्रमुख अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत.

**शासकीय विमानिधीचे कार्यक्षेत्र :**

शासकीय विमानिधी मार्फत शासकीय खाती, निमशासकीय खाती, राज्य सांविधिक संस्था व इतर औद्योगिक व व्यापारी संस्थामध्ये शासनाचे भागभांडवल, कर्ज, हमी इत्यादी स्वरूपात भरीव हितसंबंध गुंतले आहेत. अशा संस्थांच्या/ उपक्रमांच्या मालमत्तेच्याबाबतीत सर्वसाधारण

विमा भिन्न विमापत्रकाखाली उतरविला जातो. शासकीय विमानिधीचे विमाधारक हे संपूर्ण महाराष्ट्रात दूरवर विखुरलेले आहेत. शासकीय विमानिधीचे राज्यस्तरीय मुख्यालय मुंबई येथे असून शासकीय विमानिधीचा विमा व्यवहार हा मुंबई येथील मुख्यालयातून हाताळण्यात येत आहे.

**शासकीय विमानिधीच्या आस्थापनेवरील कार्यरत मनुष्यबळ :**

शासकीय विमा निधीचे कामकाज भिन्न स्वरूपाचे, तांत्रिक व वाणिज्यिक असल्याने, शासनाने शासकीय विमा निधीच्या व्यवस्थापनासाठी दिनांक १ सप्टेंबर, १९७२ रोजी विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य ही स्वतंत्र आस्थापना वित्त विभागाच्या प्रशासनिक नियंत्रणाखाली निर्माण करण्यात आली आहे. शासकीय विमानिधीचे मनुष्यबळाचा चालू आर्थिक वर्षातील तपशील खालीलप्रमाणे.

| **तपशिल** | **सन १९८५ ची स्थिती** | **सन १९९५ ची स्थिती** | **दिनांक २९.११.२०१९ च्या शासन निर्णयान्वये मंजूर आकृतीबंधानुसार मंजूर पदे** |
|---|---|---|---|
| | **मंजूर पदे** | **मंजूर पदे** | |
| विमा संचालक - गट अ | ०१ | ०१ | ०१ |
| सह विमा संचालक - गट अ | ०१ | ०१ | ०१ |
| उप विमा संचालक - गट अ | ०३ | ०४ | ०२ |
| सहाय्यक संचालक- लेखा - गट अ | ० | ० | ०१ |
| सहाय्यक विमा संचालक - गट -अ | ०७ | ०५ | ०३ |
| कनिष्ठ तांत्रिक अधिकारी - गट - ब | २० | २१ | १३ |
| तांत्रिक सहाय्यक - गट क | ६८ | ५८ | ४६ |
| लिपिक टंकलेखक, रोखपाल, वाहन चालक - गट क | ९१ | ७० | ४६ |
| शिपाई, दप्तरी - गट ड | ३२ | २४ | १० |
| **एकूण** | **२२३** | **१८४** | **१२३+*३** |

**शासकीय विमानिधीतर्फे हाताळला जाणारा विमा व्यवसाय :**

शासकीय विमानिधीची विमा अधिनियम १९३७ च्या कलम ३ अन्वये विमाकार म्हणून नोंदणी झाली असल्यामुळे स्वतंत्रपणे सर्वसाधारण विमा व्यवसायातील सर्व प्रकारचे विमा उतरवू शकते. त्यामुळे सर्वसाधारण विमा व्यवसायात प्रचलित असलेल्या खालील प्रकारच्या विमापत्रकांखाली विमा जोखीम स्वीकारून विमाछत्र दिले जाते.

**अ) आगविमा**

**ब) सागरी विमा**

**क) संकीर्ण विमा**

**शासकीय विमानिधीची विमा व्यवसाय हाताळण्याची कार्यपध्दती :**

शासकीय विमानिधीचे मुख्यालय मुंबई येथे असून शासकीय विमानिधीचा विमाव्यवहार/ व्यवसाय संपूर्ण महाराष्ट्रात विखुरलेला आहे. शासकीय विमानिधीचे विभागीय कार्यालय तसेच

जिल्हास्तर कार्यालय मुंबई वगळता अन्यत्र नाही. सार्वजनिक/ खाजगी क्षेत्रातील विमा कंपन्याकडे उपलब्ध असलेली विमा एंजट अथवा विमाब्रोकर यांची सेवा उपलब्ध नाही. त्यामुळे शासकीय विमानिधीच्या एकूण कारभारावर मर्यादा येतात. शासकीय विमानिधी महाराष्ट्रात पसरलेल्या विविध विमेदारांना खाली नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार विमा सेवा पुरविते.

**अ) प्रत्यक्ष विमासेवा**

शासकीय विमानिधीमार्फत शासनाच्या प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष वित्तीय हितसंबंधीत मालमत्तेचा अथवा दायित्वाचा भिन्न विमापत्रकाखाली विमापत्रकाच्या अटी व शर्तीनुसार विमा उतरविला जातो. विमादार शासकीय विमानिधीच्या मुंबई येथील कार्यालयात प्रत्यक्ष, पत्रव्यवहाराद्वारे अथवा त्यांच्या प्रतिनिधीमार्फत संपर्क साधून विमाहप्ता रकमेचे परिगणना करून घेतो. विमाहप्ता शासकीय विमानिधीला प्राप्त झाल्यावर सदर विमेदारास विमा स्विकारपत्र/ विमापत्र निर्गमित करण्यात येते. विमादावा उद्भवल्यास स्वतंत्रपणे सर्वेक्षकांची नेमणूक करण्यात येते व विमापत्रकाच्या अटी व शर्तीनुसार विमादावा निकाली काढण्यांसंबंधात कार्यवाही करण्यात येते. प्रकर्ता व कंत्राटदार यांच्या संयुक्त नावे विमुक्त प्रमाणपत्र घेतले जाते व प्रकर्त्याच्या सूचनांवरून विमादाव्याची रक्कम कंत्राटदारास प्रदान करण्यात येते.

**ब) अप्रत्यक्ष विमासेवा**

विमेदार/ प्रकर्ता यांनी विमासेवा स्थानिक पातळीवर मिळण्यासंबंधात आग्रह धरल्यास सार्वजनिक क्षेत्रातील चार राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांच्या सहकार्याने सहविमापध्दतीवर विमासेवा दिली जाते. याकरिता शासकीय विमानिधीची पूर्व परवानगी आवश्यक असते. सहविमाकार कंपनीने निर्गमित केलेल्या विमापत्रकामध्ये शासकीय विमानिधीचा सहभाग स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक असते. सहविमा सेवा देताना शासकीय विमानिधीचा प्रत्येक विमापत्रकाखाली सामान्यत: सहभाग ६०% इतका असणे अपेक्षित आहे. विमापत्रकाखाली विमादावा उद्भवल्यास सहविमाकार कंपनी शासकीय विमानिधीच्या अनुमतीने सर्वेक्षकांची नेमणूक करते व विमादावा निकाली काढण्याचे कार्यवाही करण्यात येते. विमादावा निकाली काढल्यानंतर सहविमाकार कंपनीला विमादाव्यातील सहभागाची रक्कम प्रदान करण्यात येते.

विमा व्यवसायातील प्रचलित प्रध्दतीनुसार विमापत्रकाखाली स्वीकार केलेल्या विमा जोखमांचा विचार करून सहविमा व पुनर्विमा पध्दतीखाली विमा जोखीम विभागून देण्यात येते.

सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग, नगरविकास विभाग, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, महामंडळे, सांविधानिक संस्था, विद्यापीठे, कृषी विद्यापीठे इत्यादींमार्फत देण्यात येणाऱ्या कंत्राटी कामांच्या चालू देयकातून कपात केलेल्या रकमांचा स्वीकार करून प्रकर्ता या नात्याने संबंधित विभागांच्या मालमत्तेस विमासंरक्षण दिले जाते.

**शासकीय विमानिधी आकारित असलेले विमाहप्ता दर :**

विमा अधिनियम १९३८ च्या तरतूदीनुसार प्रशुल्क सल्लागार समिती गठीत करण्यात आलेली असून या समितीने विहित केलेल्या विविध विमापत्रकांचे विमादर, अटी व शर्ती यानुसार

सार्वजनिक/ खाजगी विमा कंपन्यांना विमापत्रके निर्गमित करणे बंधनकारक आहे. शासकीय विमानिधी हा सुरूवातीपासून प्रशुल्क विमाकार (Tariff Insurer) असून ज्या विमाप्रकारात टॅरिफ प्रचलित आहेत, ते विमादर, विमापत्रकाच्या अटी व शर्ती शासकीय विमा निधीतर्फे विमा व्यवहारात उपयोगात आणली जात आहे. जो विमा व्यवसाय प्रशुल्क विरहीत (Non Tariff) आहे, अशा विमा व्यवसायाकरिता सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपन्यातर्फे आकारण्यात येणाऱ्या विमादारांचा तुलनात्मक अभ्यासानंतर विमादर निश्चित करण्यात येतो व विमा व्यवहाराच्या प्रचलित असलेल्या अटी व शर्तीनुसार विमा जोखीम स्वीकारली जाते.

शासकीय विमा निधीने गठीत केलेल्या प्रशुल्क दर निर्धाण समितीच्या शिफारशीवरून शासनाच्या मान्यतेने विविध विमा प्रकारानुसार ५ ते १५ % दर माहे जानेवारी, २००७ पासून डिटॅरिफसूट दिलेली आहे. सार्वजनिक/ खाजगी विमा कंपन्यांन्या आकारत असलेल्या विमादराची तुलना केली असता या विमा कंपन्या ७५ ते ९५ % पर्यंत विमादरात सूट देत आहेत. या बाबींचा अभ्यास करून शासकीय विमानिधीने वेळोवेळी विमाहप्ता कपात करण्याचे प्रस्ताव शासनास सादर केलेले आहेत.

मागील १० आर्थिक वर्षामध्ये शासकीय विमानिधीने प्राप्त विमाहप्ता, व्यवस्थापकीय खर्च, विमादावे व सहविमा इ. गुणोत्तर दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे.

Rs. In Crores

| Financial Year | Premium Gross Income | Claims Paid | Management Expenses | Net Profit |
|---|---|---|---|---|
| 2015-2016 | 223.61 | 5.42 | 5.05 | 213.14 |
| 2016-2017 | 241.58 | 10.5 | 4.93 | 226.15 |
| 2017-2018 | 261.65 | 15.1 | 4.83 | 241.72 |
| 2018-2019 | 296.28 | 63.99 | 4.36 | 227.93 |
| 2019-2020 | 350.2 | 37.51 | 6.52 | 306.17 |
| 2020-2021 | 237.85 | 23.92 | 5.59 | 208.34 |
| 2021-2022 | 358.73 | 37.03 | 6.42 | 315.28 |
| 2022-2023 | 448.06 | 36.86 | 7.76 | 403.44 |
| 2023-2024 | 554.67 | 43.62 | 8.36 | 502.69 |
| 2024-2025 | 661.39 | 42.54 | 8.51 | 610.34 |
| 2025-2026 | 604.27 | 40.09 | 7.69 | 556.49 |

**सहविमा व पुनर्विमा** व्यवस्था:

विमाक्षेत्रामध्ये सहविमा व पुनर्विमा व्यवस्था विमा जोखीम हस्तांतरीत करण्याचे मार्ग आहेत. विमा कंपनीला स्विकारलेल्या जोखमीचे धोके आणि त्यांची जोखीम धारण क्षमता विचारात घेवून सहविमा पध्दतीखाली विमा जोखीम विभागण्यात येते. विमाक्षेत्रामध्ये विमाधारकाच्या सहमतीने सहविमा पद्धतीखाली विमा जोखीम विभागण्यात येते.

पुनर्विमा व्यवस्था ही सांविधानीक स्वरूपाची असून भारतीय पुनर्विमा कंपन्यांकडे प्रत्येक विमापत्राकातील पुनर्विमा सहभाग पुनर्विमाकाराकडे हस्तांतरीत करणे आवश्यक आहे. विमाधारकाचा पुनर्विमाधारक कंपनीशी कोणताही संबंध येत नाही. विमा अधिनियम,१९३८ च्या

कलम १०१ (अ) च्या तरतूदीनुसार भारतीय पुनर्विमाकर्ता म्हणून सर्वसाधारण विमा प्राधिकरण यांच्यासोबत करार करून शासकीय विमानिधीची प्रत्येक विमापत्रकातील भाग केंद्र शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या दरानुसार देण्यात येतो.

**शासकीय विमा निधीचे वार्षिक लेखे :**

शासकीय विमा निधीसाठी लेखा पद्धत शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक:३५४६४/१३३/XIII, दिनांक ०१.०५.१९५२ अंतर्गत विहित करण्यात आली आहे. शासकीय विमा निधीच्या वार्षिक लेखांच्या लेखापरीक्षण महालेखापाल, महाराष्ट्र यांच्याकडून केले जाते. शासकीय विमा निधीचे वार्षिक अहवाल तयार करून महाराष्ट्र शासनाला सादर केले जातात. प्रत्येक आर्थिक वर्षात, वरील सर्व शिर्षकांखालील खर्चाला राज्य विधानसभेची मान्यता दिली जाते. विधानसभेने आर्थिक शिस्त म्हणून मंजूर केलेली आर्थिक मर्यादा काटेकोरपणे पाळणे आणि आर्थिक मर्यादेतील खर्चाची पूर्तता करणे हे शासकीय विमा निधीला बंधनकारक आहे.

**राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजना :**

वित्त विभागाने राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी दिनांक ०१.०४.२०१६ पासून “राज्य सरकारी कर्मचारी गट वैयक्तिक अपघात विमा योजना” सुरू केली आहे. सदर अपघात योजना शासकीय कर्मचाऱ्यांसाठी अनिवार्य आहे. सदर अपघात योजनेचे व्याप्ती दिनांक ०१.०८.२०१७ पासून निमशासकीय विभाग, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, महानगरपालिका, नागपालिका, नगरपरिषदा, महामंडळ, मंडळे, शासन. उपक्रम, मान्यताप्राप्त आणि मान्यताप्राप्त शाळा/कॉलेज, विद्यापीठे इ. करीता वाढविण्यात आली असून ती ऐच्छीक स्वरूपाची आहे. या योजनेखाली अपघाताने मृत्यू झाल्यास किंवा कायमस्वरूपी पूर्ण/ आंशिक अपंगत्व आल्यास नुकसानभरपाईची एक रकमी रक्कम प्रदान केली जाईल.

शासनाने दिनांक २४.०१.२०२३ च्या शासन निर्णायांन्वये कर्मचाऱ्याच्या गट/श्रेणीनुसार राशीभूत विमा रक्कम आणि विमा वर्गणीमध्ये वाढ केलेली आहे. राशीभूत विमा रक्कम आणि वार्षिक तपशील खालीलप्रमाणे आहे.

| गट | Capital Sum Insured | Annual Subscription | Goods & Service Tax | Total |
|---|---|---|---|---|
| गट अ | रू. २५ लाख | रू. ७५०/- | रू. १३५/- | रू. ८८५/- |
| गट ब | रू. २० लाख | रू. ६००/- | रू. १०८/- | रू. ७०८/- |
| गट क | रू. १५ लाख | रू. ४५०/- | रू. ८१/- | रू. ५३१/- |
| गट ड | रू. १५ लाख | रू. ४५०/- | रू. ८१/- | रू. ५३१/- |

विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळासाठी खाली दिलेल्या Link वर क्लिक करा.

http://doi.mahagov.tech/